# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ (१) अन्वये झालेली तक्रार

## तक्रार क्रमांक : ८५२/२०२२

तक्रारकर्ता, श्री.अनंता बबन खोपकर
मु.पो.कुंभाड, ता.खेड, जि.रत्नागिरी

विरुध्द

विद्यमान जन माहिती अधिकारी तथा स्थापत्य अभियंता, खेड नगरपरिषद, खेड
तीनबत्ती नाका, मु.पो.ता.खेड, जि.रत्नागिरी

तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा स्थापत्य अभियंता, खेड नगरपरिषद, खेड
तीनबत्ती नाका, मु.पो.ता.खेड, जि.रत्नागिरी

विद्यमान जन माहिती अधिकारी तथा आस्थापना प्रमुख, खेड नगरपरिषद, खेड
तीनबत्ती नाका, मु.पो.ता.खेड, जि.रत्नागिरी

तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा आस्थापना प्रमुख, खेड नगरपरिषद, खेड
तीनबत्ती नाका, मु.पो.ता.खेड, जि.रत्नागिरी

विद्यमान जन माहिती अधिकारी तथा आवक जावक लिपीक, खेड नगरपरिषद, खेड
तीनबत्ती नाका, मु.पो.ता.खेड, जि.रत्नागिरी

तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा आवक जावक लिपीक, खेड नगरपरिषद, खेड
तीनबत्ती नाका, मु.पो.ता.खेड, जि.रत्नागिरी

**तक्रार सुनावणीचा दिनांक : २१/५/२०२५**

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज प्राप्त दिनांक | प्रथम अपिल आदेश प्राप्त दिनांक |
|---|---|---|---|
| १८/१०/२०२१ | ---- | ८/२/२०२२ | १६/३/२०२२ |

तक्रारकर्ता यांनी दि.२५/४/२०२२ रोजीच्या अर्जान्वये " परीपूर्ण माहिती मिळाली नाही " असे कारण नमूद करुन कलम १८(१) अन्वये तक्रार अर्ज दाखल केला आहे. सदर तक्रार अर्जावर आज दिनांक २१/५/२०२५ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस तक्रारकर्ता अनुपस्थित आहेत. तसेच विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.प्रणव वसंतराव सस्ते, स्थापत्य अभियंता, खेड नगरपरिषद आणि विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.प्रमोद ठसाळे, कर व प्रशासकीय सेवा, खेड नगरपरिषद आणि विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.संतोष जाधव, लिपीक, खेड नगरपरिषद समक्ष उपस्थित आहेत व तत्कालिन जन माहिती अधिकारी श्री.विवेक विष्णु खोत, स्थापत्य अभियंता, देवगड जामसांडे न.प. आणि तत्कालिन जन माहिती अधिकारी श्री.अभिजीत पाटील, कर व प्रशासकीय सेवा, चंदगड नगरपंचायत ऑनलाइनरित्या उपस्थित आहेत. (कार्यालयाद्वारे नोटीस पाठविलेबाबतचे ट्रॅकिंग रिपोर्ट सादर करण्यात आले असून, ते नस्तीसोबत अभिलेखावर ठेवण्यात आलेले आहेत)

तक्रारकर्ता यांनी मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितली आहे.

*" खेड नगरपालिकेत एकुण कर्मचारी किती, १० वर्षापेक्षा किती कर्मचा-यांची सेवा झाली आहे याची माहिती व इतर माहिती"*

तद्नंतर तक्रारकर्ता यांनी प्रथम अपिलीय प्राधिकारी यांचेकडे कलम १९ (१) अन्वये प्रथम अपील दाखल केले.

तक्रारकर्ता यांनी दाखल केलेल्या प्रथम अपीलावर तत्कालीन प्रथम अपीलीय प्राधिकारी यांनी दि.१६/३/२०२२ रोजी सुनावणी घेऊन, "*अर्जदार यांनी मागणी केलेल्या माहितीपैकी कार्यालयीन अभिलेखात उपलब्ध असलेली माहिती पुढील १५ दिवसात जन माहिती अधिकारी यांनी अर्जदार यांना पुरवावी.*" असा निर्णय दिलेला आहे.

जन माहिती अधिकारी, आस्थापना विभाग, खेड नगरपरिषद यांनी निवदेन केले की, तक्रारदार यांना दि.२१/२/२०२२ रोजी माहिती दिली आहे. पत्राची प्रत सादर केली आहे.

यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

तक्रारकर्ता यांना उपलब्ध माहिती देण्यात आल्यामुळे, तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग
महाराष्ट्र

**(शेखर चन्ने)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : २१ मे, २०२५ .